लक्ष्मी पूजनाच्या हार्दिक शुभेच्छा!

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.२१ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ६३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 21 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 63 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## राज ठाकरेंमुळे मुंबईचा आत्मा दुखावला

# मुंबई ही गुजराती, मराठी समुदायांनी एकत्रितपणे बांधली-केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंचा दावा




**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबई ही गुजराती व मराठी समुदायांनी मिळून बनवली. पण आज राज ठाकरे जे काही करत आहेत, त्यावरून त्यांना मुंबईचा इतिहास व तिच्या ओळखीची खोली समजलीच नसल्याचे सिद्ध होते, अशी टीका केंद्रीय मंत्री तथा रिपाइं (आ) चे अध्यक्ष रामदास आठवले यांनी सोमवारी मनसे अध्यक्षांवर निशाणा साधताना केली आहे.राज ठाकरे यांनी रविवारी मुंबई व महाराष्ट्राची होणारी प्रगती मराठी माणसाच्या थडग्यावर होणार असेल तर ती खपवून घेणार नसल्याचा इशारा दिला होता. त्यांच्या या भूमिकेमुळे महाराष्ट्राचे वातावरण तापले असताना रामदास आठवले यांनी राज ठाकरे यांच्यावर वरील शब्दांत निशाणा साधला आहे. ते सोमवारी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, आज राज ठाकरे जे काही करत आहेत, त्यावरून त्यांच्यात मुंबईच्या इतिहासाची व तिच्या खोल ओळखीचा अभाव दिसून येतो. मुंबई हा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक, पण त्यासोबतच गुजरातशीही तिचा ऐतिहासिक संबंध आहे हे आपण विसरू नये.

गुजराती व मराठी समुदायांनी शतकानुशतकांपासून मिळून मुंबई बांधली आहे. ती आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध केली आहे. हे शहर केवळ महाराष्ट्राचा अभिमान नाही, तर त्याचा एक भाग गुजरातशीही आत्मियतेने सांधला गेला आहे. आज राज ठाकरे जे काही करत आहेत ते संकुचित व फुटीर राजकार आहे. त्यामुळे मुंबईचा आत्मा दुखावला जात आहे, असे ते म्हणाले.रामदास आठवले पुढे म्हणाले, बाळासाहेब ठाकरे मराठी अस्मितेसाठी लढले, परंतु त्यांनी कधीही या शहराकडे संकुचित दृष्टीने पाहिले नाही. येथे गुजराती असो वा मराठी, प्रत्येकजण मुंबईकर आहे. राज ठाकरेंना भाषणे देण्याची कला आहे. व्यंग्यात्मक भाष्य करण्याचीही कला आहे, परंतु त्यातून कोणतेही ठोस किंवा रचनात्मक परिणाम मिळत नाहीत. त्यांना खरोखर महाराष्ट्राच्या भल्यासाठी काही करायचे असेल, तर त्यांनी आंबेडकरी चळवळ, बहुजन विकास व शैक्षणिक सुधारणा यासारख्या गंभीर मुद्द्यांवर काम केले पाहिजे. महाराष्ट्राचे नेतृत्व केवळ ओरडून केलेली भाषणबाजी व वादग्रस्त विधानांनी करता येणार नाही, असेही रामदास आठवले यावेळी राज ठाकरे यांचे कान टोचताना म्हणाले.



























संपादकीय

# खरेदीची लाट अन् दिवाळीची धूम



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जीएसटी कपातीचा निर्णय घेतल्यानंतर बाजारात उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झालेले दिसू लागले आहे. नवरात्रीत दिवाळी खरेदीसाठी जोरदार खरेदीची लाट उसळली होती. पण दिवाळीतही ही लाट कायम आहे आणि जीएसटी कपातीच्या रूपाने भारताला ही भेट मिळाली आहे असे समजले जात आहे. पण सर्वात जास्त फायदा ई कॉमर्सच्या व्यवसायाला आलेल्या झळाळीमुळे आहे. यंदाच्या दिवाळीमध्ये बाजारपेठांमध्ये अतिरिक्त उत्साह निर्माण झाला आहे. कारण ग्राहक लक्षणियरीत्या खर्च करत आहे आणि त्यांची क्रयशक्ती वाढली आहे.त्यांच्या जोडीला जीएसटी कपात मदतीला आहे आणि कॉर्पोरेट कंपन्यांमध्येही कामगिरीने उत्साहाचे वातावरण आहे. सहसा कोणताही सणांचा उत्सव हा अर्थव्यवस्थेला चालना देणाराच असतो. तो प्रमुख आर्थिक कॅटलिस्टही असतो. त्यांचे अनेक घटक आहेत जसे की या काळात ग्राहकांची खरेदीचा उत्साह उतू जात असतो आणि खर्च अतोनात केला जातो. वास्तविक भारताची परिस्थिती आज काही वर्षापूर्वी होती तशी नाही. आज भारताचा ग्राहक खिशात बऱ्यापैकी पैसे धेऊन दुकानात जात असतो. महागड्या वस्तू खरेदी करत असतो. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इडस्ट्रीजने सांगितले, की दिवाळी हे वाढीचा सर्वात महत्त्वाचा घटक असतो आणि ते यंदा दिसले आहे. दिवाळीच्या दिवसात सुवर्णाची खरेदी आणि गृहोपयोगी वस्तूंची खरेदी जोशात केली जाते.यंदाही ती लाट दिसते आहे. तसेच पारंपरिक आणि ऑनलाईन रिटेलर्सची विक्री वाढली आहे. यामुळे बाजारात खरेदीची धूम आणि ग्राहकांची अतोनात गर्दी दिसून येते. यंदा दिवाळीची खरेदी किती झाली ही आकडेवारी आज समोर नसली तरीही अगदी काही दिवसांत ती समोर येईल आणि ती रेकॉर्ड ब्रेक असेल असा अदाज आहे. फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन या ई-कॉमर्सच्या विशाल कंपन्यांकडे प्रचंड मागण्या आहेत आणि त्या पूर्ण करण्याच्या तयारीत आहेत. वाढत्या किमती असूनही सोन्याच्या खरेदीला उत आला आहे. रिझर्व्ह बँकेने नवीन नियम घालून दिल्यानुसार सोने खरेदी आणि सोन्यावर कर्ज मिळवणे सोपे झाले आहे ही ग्राहकांच्या समाधानाची बाब आहे.

दिवाळी हा सण संपत्ती निर्मिती आणि व्यापारी आकार वाढवण्यासाठी शुभ समजला जात असल्याने गुंतवणूकदारांसाठी हा सण उत्साहाने भारलेला असतो. त्या दृष्टीने मोदी सरकारने आल्यापासून जनतेला एकापेक्षा एक भेटी देण्याचे ठरवले आहे आणि त्यापैकीच आहे जीएसटी कपात. जी एसटी कपातीमुळे ग्राहकांच्या खिशातील बराचसा पैसा वाचला असून तो आपोआपच बाजारात ओतला जात आहे. जीएसटी २.० मुळे अनेक वस्तूंच्या किमती जनतेच्या आवाक्यात आल्या आहेत आणि आयकर सुधारणांमुळे उपभोग आणि खासगी भांडवली खर्च आटोक्यात आला आहे. दिवाळी खरेदीमुळे किरकोळ विक्री वाढते आणि उत्पादनाला चालना मिळते आणि अर्थव्यवस्थेत मोठी उलाढाल होते. हा आतापर्यंतचा अनुभव आहे. यंदाच्या दिवाळीच्या उत्साहात ग्राहक कपडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि घरगुती वस्तूंच्या खरेदीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला गेला आहे. हे दिसतेच. या काळात मागणी वाढल्यामुळे कंपन्यांना अधिक उत्पादन करावे लागते आणि त्यामुळे उत्पादनाला चालना मिळून रोजगार निर्मिती जोरदार होते. त्यात यंदा जीएसटी कपातीचा शॉक नसल्यामुळे किंवा बराचसा कमी झाल्यामुळे ग्राहकांच्या खिशात पैसा अधिक वाजू लागला आहे. दिवाळीमुळे कर महसुलात वाढ ही चांगलीच होते आणि ही बाब आर्थिक वाढीसाठी उत्साहवर्धक असते.दिवाळी हा केवळ प्रकाशाचा सण नाही तर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही तो एक प्रकाशमान सण आहे. हा सण अर्थव्यवस्थेला चालना देणारा आहे. त्यामुळे भारतात ग्राहकांच्या संख्येत अविश्वसनीय वाढ झाली आहे. यंदाच्या दिवाळीत ४ ते ४.२५ कोटी लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. २०१९ पासून ते २०२५ पर्यंत दिवाळीच्य ग्राहकांनी केलेल्या खर्चात अनपेक्षित वाढ झाली आहे. २०२४ मध्ये तो दिवाळीला ४.२५ लाख कोटी होता. यंदा तो यापेक्षाही अधिक असण्याची अपेक्षा आहे. यंदा बरेच ग्राहक ऑनलाईन खरेदीकडे वळल्याने ई कॉमर्सच्या व्यवसायात प्रचंड वाढ झाली आहे आणि २०१९ मध्ये ३५ हजार कोटी रुपयांवरून ई कॉमर्सचे मूल्य १.२ लाख कोटी रुपयांपर्यंत गेले आहे.दिवाळी खरेदीसाठी रस्ते ओसंडून वाहत आहेत आणि नेहमीप्रमाणे वाहतूक कोंडी होऊ लागलीय. पण सोने खरेदीसाठी याच काळात ग्राहकांची झुंबड उडते. यंदा सोन्याची विशेषतः खरेदी विक्रमी झाली ती आहे ती एक लाख कोटी रुपये. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात यंदा २५ टक्के वाढ झाली आहे. एकाच दिवशी एक लाख कोटी रुपयांची विक्री ही सोन्याचा उच्चांक तर आहेच पण तो विक्रमी आहे. तितकीच चांदीची विक्रीही झाली आहे. सोन्याकडे ग्राहकांचा कल वाढतो आहे आणि त्यामुळे सोन्याच्या खरेदीत वाढ होणे साहजिक आहे. दिवाळी हा सण शुभ मानला जातो आणि त्यामुळे पारंपरिक उत्साहात जाऊन लोक खरेदी करत असतात. दिवाळीच्या दिवशी सर्वच व्यवसायांसाठी तेजीचे दिवस असतात आणि त्यमुळे ग्राहकांच्या खिशात पैसा ओसंडून वाहत असतो.त्यामुळे यंदा बाजारात ग्राहकांची रेलचेल दिसत आहे. संपूर्ण देशभरातील आकडेवारी नाही तरी जी आकडेवारी आहे ती प्रातिनिधिक म्हणावी लागेल. त्यानुसार ही सोन्याचांदीच्या वस्तुंच्या विक्री झाली ती ६० हजार कोटी रुपये तर किचन घरगुती वापराच्या वस्तूंची विक्री झाली ती १५ हजार कोटी रुपये. इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तूंची विक्री पोहोचली ती यंदा १० हजार कोटी रुपये. मेवा मिठाईची विक्री झाली ती १२ हजार कोटी रुपये. यावरून ग्राहकांची पोझिशन कळते आणि त्यावरून हा निष्कर्ष निघतो की दिवाळी असो की सणासुदीचे दिवस असो ती इलेक्शन, भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे इंजिन्स आहेत.

# गावाकडील आठवणीतील दिवाळी



भारतीय संस्कृतीतील प्रमुख सणांपैकी दिवाळी हा प्रमुख सण आहे.साधारण हा सण पाच ते सहा दिवसांचा असतो. दिवाळसणाची चाहूल ही वसुबारसपासून लागते.हा सण अश्विन महिन्यातील वद्य द्वादशीला साजरा केला जातो. याला गोवत्स द्वादशीसुद्धा म्हणतात.या दिवशी वसुबारस अर्थात गाय व तिच्या वासराची पूजा केल्या जाते.दिवाळसणातील दुसरा दिवस म्हणजे धनत्रयोदशी.हा सण नेपाळ व भारतात साजरा केला जातो.हिंदू परंपरेनुसार धन्वंतरी देवता आरोग्याची देवता म्हणून ओळखल्या जाते. सर्वांचे आरोग्य निरोगी राहो यासाठी या देवतेचे पूजन केल्या जाते.निरोगी शरीर व मनाच्या प्रसंन्नतेसाठी प्रार्थना केली जाते.त्यानंतर तिसरा दिवस हा नरक चतुर्दशी म्हणून ओळखला जातो. या दिवशी अभ्यंगस्नान केले जाते.हा सण वाईटांवर चांगल्यांचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो.चौथा दिवस हा लक्ष्मी-कुबेराच्या पूजनाचा असतो. या दिवशी लक्ष्मी कुबेर या देवतेचे पूजन केले जाते.धन हे लक्ष्मीचे प्रतीक मानल्या जाते.अर्थात पैसा केवळ हे गरज भागवण्याचे साधन असले, तरी घरात सुख-समृद्धी नांदो.यासाठी लक्ष्मी-कुबेराचे पूजन केले जाते. दिवाळी सणातील पाचवा दिवस हा दीपावली पाडवा व बलिप्रतिपदा म्हणून साजरा केला जातो.यातील दीपावली पाडवा पती-पत्नीच्या प्रेमाचे प्रतीक आहे, तर बलिप्रतिपदा हा शेतकरी राजांच्या उदार व समर्पण भावाचे प्रतीक आहे. दिवाळी सणातील अंतिम दिवशी भाऊबीज हा सण साजरा केल्या जातो. या दिवशी बहिण भावाला औक्षण करते. त्याच्या सुखा-समाधानासाठी व दीर्घ आयुष्यासाठी प्रार्थना करते. या सर्व पाच ते सहा दिवसांच्या सणांच्या आनंदमय वातावरणामुळे चहूकडे प्रसन्नता असते.

या दिवाळी सणाला संपूर्ण महाराष्ट्रबरोबर भारतातील शाळा- महाविद्यालयांना सुट्ट्या असतात.जिल्ह्यानुरूप साधारण दहा ते पंधरा दिवसांच्या या सुट्ट्यांमध्ये मुले खूप धमाल करतात. मात्र गावाकडे आमच्या काळात काही अंशी वेगळी परिस्थिती होती.प्रथम सत्र परीक्षा झाली की,आम्ही मुलं शेतात कामाला जायचो. हा काळ म्हणजे शेतकऱ्यांच्या सुगीचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात सोयाबीन, मका काढणीवर येतात तर झाडावर पिकलेल्या लाल मिरच्या तोडण्याची वेळ असतें. त्याचबरोबर कापूस वेचणीचीही वेळ असते.खरीप पिक घेऊन शेतकरी राजा हा रब्बी पिक पेरणीच्या तयारीला लागलेला असतो. तर या काळात शेतकरी हे शेतीच्या कामात गुंतलेले असायचे. खरिपातील हंगाम घेऊन रब्बीच्या तयारीला लागलेले असायचे. दिवाळीच्या सुट्ट्या लागलेल्या असायच्या. आमच्याकडे स्वतःची शेती नव्हती.आम्ही भावंडे गल्लीतील मित्रमंडळीसोबत दुसऱ्याच्या शेतात किलो प्रमाणे मिरच्या तोडायला व कापूस वेचला जायचो.

गावाकडील शाळेला दिवाळीला मस्तपैकी पंधरा दिवस सुट्ट्या असायच्या व आमच्या मनाच्या त्यात पाच दिवसअश्या एकूण साधारण वीस दिवसाच्या सुट्ट्या पकडून शाळेला दांडी असायची. सुट्ट्या लागल्याबरोबर दुसऱ्या दिवशी कुणी शेतकऱ्यांने बोलवल्यास शेतात मिरच्या तोडायला व कापूस वेचायला कामावर येण्यास हो म्हणायचो. कारण या कामातून मिळालेल्या पैशातून आम्ही पोरं फटाके, शाळेच्या वस्तू वगैरे घ्यायचो. मला तर लहानपणापासून शालेय वस्तूंचीच आवड होती.त्यामध्ये विशेषतः छान पेन, चित्रकलेची वही, रंग कामाचे साहित्य, एखादे-दोन छान-छान गोष्टीचे पुस्तके यासाठी हा सर्व खर्च करायचो. कारण मला लहानपणापासून चित्रकला, पुस्तक वाचनाबरोबर शाळेसंबंधी वस्तू खरेदी करण्याची खूप हौस होती. अजूनही आहेच. त्यामध्ये विशेषतः डायरी, पेन पुस्तक रंगकामासाठी साहित्य या गोष्टी मला अजूनही खरेदी करायला आवडतात.

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये सकाळी लवकर उठायचो. ऑक्टोबर- नोव्हेंबरचा काळ असल्यामुळे काही अंशी थंडीची चाहूल लागलेली असायची. त्यातही आई-बाबा आम्हाला सकाळी पाच ते सहा वाजताच झोपेतून उठवायचे.आंघोळ केली की झोप उडवायची.मात्र थंडी जाणवल्यास बाहेर शेकोटी पेटवायचो. शेकोटीतून उब घ्यायचो. तोपर्यंत आई स्वयंपाक बनवायची.आई वावरात नेण्यासाठी पालवामध्ये भाकरी बांधून द्यायची.एक टोपलं घेऊन मिरच्या तोडण्यासाठी वावरात निघायचो.कापूस वेचायला गेलो तर मात्र,आईच्या जुन्या लुगड्याचा कापड घेऊन जायचो,कारण कापूस वेचण्यासाठी त्याची ओटी बनवावी लागायची.सकाळी-सकाळी सुंदर सूर्यप्रकाशात आम्ही पोरं पंढरीला निघणाऱ्या वारी प्रमाणे पांद-रस्त्याने वावरात जायचो. जातांना मौज-मस्ती करत जायचो. रस्त्याने एखादी विहीर लागली की, लगेच एक डुबकी मारायचो.तशाच ओल्या अंगाने कुडकुडत निघायचो. हवेने आणि सूर्यप्रकाशाने अंगावरील कपडे कधी सुकून जायचे हे कळतही नव्हते. खरंच! किती हा रांगडेपणा...! आता आठवण आली तर डोळ्यातून अश्रूंच्या धारा थांबत नाही. या आठवणींच्या साठवणीचं भलं मोठं गाठोड उकलायला लागलो की,गावाकडील जगलेले सुवर्णक्षण एकामागून बाहेर पडतात व मन आठवणीत रमून जातं. वावरात पोहोचले की, आंब्याच्या किंवा निंबाच्या झाडाला चटणी,भाजी भाकरी टांगून द्यायचो. कारण खाली ठेवली तर कुत्रे येऊन खाऊन टाकायचे.काम करून थकल्यामुळे अश्यावेळेस कडाडून भूक लागल्यावर पंचायत व्हायची.म्हणून तशी काळजी घ्यावी लागे. वावरातील एक तास म्हणजे एक सरळरेषेत लावलेली मिरचीच्याकिंवा कपाशीच्या झाडांची रांग. तर अश्या दोन रांगा एका-एकाने घेऊन मिरची तोडायला किंवा कापूस वेचायला सुरुवात करायचो. त्या दोनतासालावखरम्हणायचे. दिवसभरातून साधारण आम्हां चौदा ते पंधरा वयोगटातील मुलांकडून साधारण तीस ते पस्तीस किलोपर्यंत मिर्च्या तोडून व्हायच्या.संध्याकाळी शेतमालक तोडलेल्या मिरच्यांची पोतडी वजन काट्याला टांगून वजन करायचे. कागदावर नाव लिहून नोंद ठेवायचे. साधारण एक रुपया किलो प्रमाणे प्रमाणे तोडायची मजुरीअसायची. म्हणजेच तीस ते पस्तीस रुपये रोज त्या काळात आम्ही शेतात काम करून कमवायचो.

दिवाळीच्या या पंधरा ते वीस दिवसाच्या सुट्ट्यांमध्ये जवळपास दहा ते बारा दिवस कामाला गेल्यावर साधारण साडेचारशे ते पाचशे रुपये कमवायचो.चारसे ते पाचशे रुपये म्हणजे आमच्यासाठी खूप होते. एका आठवड्याचे किंवा साधारण दोन आठवड्याचे हे बाजाराच्या दिवशी जमा झालेले पैसे आम्ही मुलं एका डब्यात ठेवायचो.दिवाळी जवळ आली की, आवडीच्या वस्तू खरेदी करायचो. खेड्यातील हे जीवन म्हणजे गोरगरीब लोकांच्या जीवन जगण्याच्या कसोटीतील क्षणांचा चित्रपट असतो.अनेक अडचणी असूनही आनंदाने कसे जगावे? खेड्यातील माणूस यातील एक कलाकार म्हणून महत्त्वाची भूमिका निभावत असतो. जरी त्याची नोंद नसली तरी,मात्र ज्याने हे क्षण अनुभवले तो त्या कथेतील नक्कीच हिरो असतो. विशेषतः गावाकडील माझा शेतकरी राजा. हा दिवाळसणासारख्या या प्रमुख सणांमध्ये सुद्धा शेतात राब-राब राबत असतो. केवळ सर्वांच्या मुखी घास यावा. यासाठी तो सदैव झटत असतो. येणाऱ्या अस्मानी,सुलतानी संकटांचा सामना करत.तो खंबीर उभा असतो.एखाद्या पर्वतासारखा.ऊन, वारा पाऊस सर्व काही सुख-दुःख सहन करत जगत असतो.

दिवाळसणातील वसुबारसच्या पहिल्या दिवसापासून लागलेली चाहूल ते भाऊबीज या दरम्यान शाळेला लागलेल्या पंधरा ते वीस दिवसाच्या सुट्ट्यात वावरात जाऊन जमवलेल्या पैशातून आवडीच्या वस्तू खरेदी करायचो.काहीजण घरातील गरजेच्या वस्तूसाठी हातभार लावायचे.बाबा आमच्यासाठी कपडेलत्ते घ्यायचे.आई गोडधोड असे फराळाचं बनवायची. त्यामध्ये चकली, चिवडा,शेव बेसनाचे लाडू, रव्याचे लाडू शंकरपाळे,करंजी वगैरे असे पदार्थ असायचे.मित्रमंडळी एकमेकांना फराळाला बोलवायचे.यातून गाठीभेटी व्हायच्या. परिस्तिथी लक्षात घेऊन काही वडिलधारे मंडळीनी नवीन कपडे खरेदी केले नाही तरी त्यांना स्वच्छ धुऊन प्रेस मारून घालायचे.मात्र कधी त्याचे दुःख मानले नाही. मर्यादित गरजा होत्या.मात्र त्यातही जगण्यात खूप आनंद होता. गावाकडील लोकांचं जगणं व जश्या आहे तश्या परिस्थितीत आनंद मानून सण साजरे करण्यात खूप मोठे गूढ आणि समर्पण सुद्धा होते.

गावाकडील लोक सुखी,समाधानी व आनंदी आहेत.त्यांना डिजिटल लाईफ अजून माहीत नाही.अन जे झगमगाटात जगतात.डिजिटल होऊ पाहतात त्यांना एकमेकांना स्टोरी, स्टेट्स ठेऊन दाखवाव लागतंय कि,आम्ही आनंदी आहोत. विशेष म्हणजे काहिजण तर, या पण भ्रमात असतात स्टोरी, स्टेट्स न टाकणारे सुखात नसावेत.पण सत्य असं असतं की, ते लोक दाखवण्यापेक्षा प्रत्यक्षात त्या वास्तविक क्षणात त्यांचं सुख साजरं करत असतात.त्यांना या दिखावेपणाच्या मायावी जगाची अनुभूती आधीच आलेली असते.अशी ही गावाकडील साजरी होणारी ही दिवाळी खरंच!सुवर्णक्षणाचा साठा आहे.गावाकडील लोकांचा सण समारंभ साजरा करण्यात साधेपणा असला तरी मात्र रूढी,परंपरेला व संस्कृतीला धरून सण साजरे होतात.त्याचप्रमाणे निखळ प्रेम,आनंद,प्रसन्नता दिसून येते.अश्या या गावाकडील दिवाळीच्या आठवणी कायम स्मरणात राहतील.

**श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता जि बुलडाणा**
**मो नं ९७६३२८२०७७**

# भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये हे अमेरिका ठरविणारा कोण?

आंतरराष्ट्रीय संबंध कसे टिकवायचे आणि कोणासोबत टिकवून ठेवायचे याची जाणीव भारताला चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला कोणत्याही प्रकारचा आंतरराष्ट्रीय सल्ला देवू नये.अमेरिकेला जर चांगला सल्ला पाहिजे असेल तर त्यांनी भारताजवळुन घ्यावा त्याचे भलेच होईल.ट्रम्प म्हणाले की ब्रेकिंग न्यूज देऊ का?भारत रशियाचे तेल घेणे थांबवणार! परंतु असे काहीच नाही.कारण डोनाल्ड ट्रम्प यांचे दररोज देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत विवादास्पद आणि बिनबुडाचे बयान येत असतात यात काही नवीन नाही किंवा तथ्य नाही.त्याच पध्दतीचा भारत-रशिया तेल धोरणाबद्दल ट्रम्प स्वतःची पाठ थोपटणारे वक्तव्य केले आहे.जगातील अनेक देशांना कल्पना आहे की अमेरिका केव्हा व कधीही कोणालाही धोका देवू शकतो.त्यामुळे आजच्या परिस्थितीत अमेरिका व खासकरून डोनाल्ड ट्रम्प विश्वास पात्र रहाले नाही.जगाला कल्पना आहे की नोबेल शांती पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प प्रत्येक देशाच्या दारोदारी फिरत होते व मला नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी संपूर्ण शक्तीनिशी दबावतंत्राचा वापर करीत होते.परंतु संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले.नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प पाकिस्तानसमोर झुकले सुध्दा.परंतु नोबेल शांती पुरस्कारांपासून डोनाल्ड ट्रम्पला कोसो दूर फेकल्या गेले. अशाप्रकारे ट्रम्पची पुरस्काराची कथा,प्रथा,व्यथा संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली आणि त्यांच्या आशा आकांक्षा संपूर्ण धुळीस मिळाल्या.कोणताही पुरस्कार असो मागावा लागत नाही, मिळवावा लागतो यासाठी त्या पध्दतीची प्रतीमा तयार करावी लागते व मेहनत करावी लागते आणि कोणताही पुरस्कार हे मेहनतीचे फळ असते.ज्यांचे नाव कधी चर्चेत नव्हते त्या दक्षिण अमेरिका खंडातील व्हेनेझुएलामध्ये लोकशाहीला प्रोत्साहन आणि हुकुमशाहीच्या विरोधात लढण्यासाठी विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला.मारिया कोरिना मचाडोला हा मिळालेला पुरस्कार त्यांच्या कर्तृत्वाच्या कामगिरीवर मिळाला आहे आणि नोबेल पुरस्काराच्या शर्यतीत धावणाऱ्या ट्रम्पची हवा गुल होऊन चारोकोणे चीत झाले. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या कोणत्याही वक्तव्याकडे किंवा भाष्याकडे भारतासह कोणताही देश बारकाईने लक्ष देत नाही. रशिया व भारत असा देश आहे की जसा शब्द देतो तसा पाळतो सुध्दा आणि दिलेला प्रत्येक शब्द काळ्यापाटीवरील पांढरी रेष असते.त्यामुळे भारताने तेल रशिया जवळुन खरेदी करावे की नाही ही भारत-रशियाची विदेश निती ठरवित असते.त्यामुळे रशियाच्या बाबतीत अमेरिकेने कितीही दबाव तंत्राचा वापर केला तरी भारत-रशिया संबंध यत्किंचितही डगमगणार नाही ही बाब ट्रम्पने लक्षात ठेवली पाहिजे.कारण संपूर्ण जगाला चांगल्याप्रकारे ग्यात आहे की ट्रम्प काय आहे.ट्रम्पच्या अनेक चुकीच्या निर्णयामुळे अमेरिका अडचणीत आला आहे व डोनाल्ड ट्रम्प स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक देशांना धोका देऊन त्यांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडले याचे अनेक उदाहरण जगापुढे आहेत. अमेरिकेतील विदेशी नागरिकांनी ट्रम्पच्या विरोधात जात आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने नव्या एच १बी व्हिसा फीचे शुल्क एक लाख डॉलर (सुमारे ८८ लाख रुपये) इतके वाढविल्याच्या निर्णयावर यूएस चेंबर ऑफ कॉमर्सने कोलंबिया येथील न्यायालयात सरकारविरोधात खटला दाखल केला आहे.यावरून स्पष्ट होते की ट्रम्प प्रशासनाचा निर्णय दिशाहीन असून बेकायदेशीर आणि मनमानीवाला आहे,असा दावा याचिकेत केला आहे आणि ही बाब सत्य आहे.अशाच चुकीच्या निर्णयाची पुनरावृत्ती भारत-रशिया संबंधांच्या बाबतीत ट्रम्प करीत आहे. युक्रेन-रशिया युध्द संपविण्याच्या उद्देशाने डोनाल्ट ट्रम्प म्हणतात, भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही असे आश्वासन भारताचे पंतप्रधान व माझे मित्र नरेंद्र मोदी यांनी मला दिले असल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १५ आक्टोंबरला केला.खरे पहाले तर भारताने अशा पद्धतीचे कोणतेही पाऊल उचलले नाही आणि उचलणार सुध्दा नाही.कारण भारताने रशियाला व रशियाने भारताला अनेक संकटकाळीन परिस्थितीत दोघांनी एकमेकांना मदत व सहाय्यता केली आहे आणि अमेरिकेचा विचार केला तर अमेरिकेने नेहमीच पाकिस्तानला मदत करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या वक्तव्यावरून स्पष्ट लक्षात येते की त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे.आंतराष्ट्रीय बाजारात रशियाचे तेल आजही सर्वात स्वस्त, किफायतशीर आहे आणि रशियाचे भारतासोबतचे ऊर्जा संबंध हे भारताच्या राष्ट्रीय हिताशी सुसंगत आहेत. जागतिक बाजारात रशियापुढे अमेरिकेने अनेक अडथळे आणले गेले परंतु त्यांना न जुमानता, रशियाने सातत्याने बांधिलकी जपली.तसेच पर्यायी पुरवठा साखळी व पेमेंट सिस्टीममध्ये देखील लवचिकता दाखविली.रशियासारखे धाडस अमेरिकेत अजीबात नाही ही बाब स्पष्ट दिसून येते. ट्रम्पच्या वक्तव्यानंतर भारताची रशियातून तेल खरेदी जोमाने वाढली असून अमेरिकेच्या धमक्यांचा तेल खरेदीवर तिळमात्र परिणाम आलेला नाही.सध्याच्या परिस्थितीत अमेरिकेने फसव्या योजनांना सुरूवात केली आहे यात पॅलेस्टाईन- इजरायल संघर्ष ट्रम्प यांची फसवी योजना असल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे रशियाच्या तेलावरून भारताच्या बाबतीत ट्रम्पने टाकलेला तेल बॉम्ब फुस्सी निघाल्याचे स्पष्ट दिसून येते.

**रमेश कृष्णराव लांजेवार**

# स्वयंपाक करताना कोणते तेल वापरणे आरोग्यासाठी चांगले?

सणासुदीच्या काळात, किंवा रोजचा स्वयंपाक बनवण्यासाठी देखील एक गोष्ट आहे ज्याशिवाय जेवण तयार होऊ शकत नाही. ते म्हणजे तेल. भाजी बनवण्यासाठी, काही तळण्यासाठी तेल हे लागतेच. बहुतेक घरांमध्ये स्वयंपाकासाठी मोहरीचे तेल किंवा रिफाइंड डालडा तेल वापरले जाते. तथापि, हे आरोग्यासाठी खूप हानिकारक मानले जाते. आता, मग आरोग्यासाठी चांगले असणारे स्वयंपाकाचे तेल कोणते जे कोणताही विपरीत परिणाम करत नाही. या तेलांमध्ये बनवलेले अन्न खाल्ल्याने तुमचे हृदय आणि मनही निरोगी राहील आणि वजन वाढण्यासही प्रतिबंध होईल. स्वयंपाकासाठी कोणते तेल वापरले पाहिजेत हे जाणून घेऊयात.प्रसिद्ध गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टांच्या म्हणण्यानुसार तुम्ही योग्य स्वयंपाक तेल निवडले तर तुमच्या आरोग्याचे कधीही नुकसान होणार नाही. खरं तर, ते तुमचे आरोग्य सुधारेल आणि तुम्हाला तंदुरुस्त ठेवेल.आपण वर्षानुवर्षे नारळाचे तेल वापरत आहोत, पण तुम्ही कधी ते स्वयंपाकासाठी वापरले आहे का? या तेलात बनवलेले अन्न लवकर खराब होत नाही किंवा जळत नाही. ते कमी तेलकट देखील मानले जाते. नारळाचे तेल शरीराला ऊर्जा प्रदान करते.तुम्ही स्वयंपाकासाठी शेंगदाण्याचे तेल देखील वापरू शकता. शेंगदाण्याच्या तेलात आरोग्यासाठी उपयुक्त असे अनेक पोषक घटक असतात. शिवाय, त्यात शिजवलेले अन्न खराब होत नाही.शतकानुशतके भारतीय स्वयंपाकघरांमध्ये तूप वापरले जात आहे. तथापि, तूप महाग आहे, म्हणून लोक बहुतेकदा तेल किंवा रिफाइंड तेलाचा वापर करतात. तुम्ही तूप वापरून देखील स्वयंपाक करू शकता. पण नक्कीच प्रमाणातच वापर करा.ॲव्होकॅडो तेल हे देखील सर्वोत्तम तेल मानले जाते. ॲव्होकॅडो तेलाला सुगंध असतो आणि त्यात तयार केलेले पदार्थ चांगले टिकतात .तसेच त्यात तळलेले पदार्थ खाल्ल्याने त्रास होत नाहीदरम्यान या तेलापैकी कोणतेही तेल वापरत असाल तरी ते प्रमाणातच वापर करा. कारण कोणतीही गोष्ट अतिप्रमाणात खाणे हानिकारकच असते. त्यामुळे प्रमाणात वापर केल्यास त्याचे आरोग्याला फायदे नक्की मिळतात.

# प्रेमाला विरोध, दोघांनी आयुष्य संपवलं

## गळफास घेवून केली आत्महत्या : लातूर तालुक्यातील पेठ गावच्या शिवारात ही घटना

दैनिक वादळ वार्ता

**लातूर | नदीम पटेल**

लातूर शहराजवळ दोघांनी गळफास घेत आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणो लातूर ग्रामीण पोलास आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने तपास सुरु केला आहे. घरच्यांच्या विरोधामुळे प्रेमी युगुलाने गळफास घेत आत्महत्या केली. दोघेही बीड जिल्ह्यातील रहिवासी असून अनेक वर्षांपासून प्रेमसंबंधात होते. या घटनेची माहिती मिळताच लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला आहे.प्रेमसंबंधांना घरच्यांचा विरोध झाल्याने एका नर्स महिलेने आणि एमपीएससीपरीक्षेची तयारी करणाऱ्या अपंग तरुणाने एकत्र आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना लातूर जिल्ह्यात घडली आहे. पेठ गावच्या शिवारात घडलेल्या या घटनेमुळेपरिसरात एकच खळबळ उडाली आहे. नितीन दराडे आणि राणी दराडे (दोघेही राहणार दरडवाडी, ता. आंबेजोगाई, जि. बीड) अशी मृतांची नावे आहेत.प्रेमसंबंधांना घरच्यांचा विरोध झाल्याने एका नर्स आणि एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या अपंग तरुणाने एकत्र आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना लातूर जिल्ह्यात घडली आहे. हकायमचं एकत्र राहण्यासाठी या जोडप्याने घेतलेलं टोकाचं पाऊल आता सर्वांना हादरवून सोडलंय. पत्र्याच्या एका खोलीत एका बाजूला तरुणाने गळफास घेत आयुष्य संपवले तर त्याच खोलीत नर्स तरुणीनेही गळफास घेतल्याचा प्रकार उघडकीस आला.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नितीन दराडे हा शारीरिकदृष्ट्या अपंग असून गेल्या दोन ते तीन वर्षांपासून एमपीएससी परीक्षेची तयारी करत होता.



तो अहमदपूर येथेराहून अभ्यास करत होता. दुसरीकडे, राणी दराडे ही व्यवसावाने नर्स असून ती लातूर येथील खासगी रुग्णालयात कार्यरत होती. दोघेही भावकीतील असल्याने आधीपासून दोघांची ओळख होती. ओळखीचं रुपांतर प्रेमात झालं मात्र, दोघांच्या प्रेमसंबंधांना दोन्ही कुटुंबीयांनी विरोध दर्शवला. घरच्यांच्या या विरोधामुळे मानसिक ताण आलेल्या या जोडप्याने टोकाचा निर्णय घेत आपली जीवनयात्रा संपवली, अशी प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.दोघांचे मृतदेह लातूर जिल्ह्यातील पेठ गावच्या शिवारात सापडले.

स्थानिक नागरिकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक आणि स्थानिक गुन्हे अन्वेषणविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी (पोस्टमार्टमसाठी) लातूर जिल्हा रुग्णालयात पाठवले आहेत.या घटनेमुळे दरडवाडी गावासह संपूर्ण परिसरात खळबळ उडालीय. दोघेही शिक्षित आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयल करणारे तरुण होते. मात्र दोघांनीही असं पाऊल उचलल्याने गावात या घटनेची एकच चर्चा आहे. नितीनच्या अपंगत्वावर मात करून तो स्पर्धा परीक्षांची तयारी करत होता, तर राणीने वैद्यकीय क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण केलं होतं. पण समाजातील दडपण आणि घरच्यांच्या विरोधामुळे त्यांनी घेतलेल्या या निर्णयाने गावकऱ्यांसह कुटुंबीय सुन्न झाले आहेत.

# या जगात आई शिवाय दुसरे कोणीही मोठे नाही ह.भ.प.–समाधान महाराज शर्मा

## कै.चंद्रकलाताई गदळे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा शालेय संस्थापक अध्यक्ष सखाहारी तात्या गदळे यांच्या पत्नी व भाजपा युवा मोर्चाचे केज तालुकाध्यक्ष राहुल भैय्या गदळे,जयदत्त दहिफळ कर यांच्या मातोश्री कै. सौ.चंद्रकलाताई सखाहारी गदळे यांच्या चतुर्थ पुण्य पुण्यस्मरणा निमित्त दहिफळ वड माऊली येथील श्रीक्षेत्र वडमाऊली मंदीरा जवळ ह.भ.प.सखाहारी तात्या गदळे यांनी स्थापन केलेल्या शिव प्रतिष्ठाण संस्थान येथे सुप्रसिद्ध रामायणाचार्य विविध कथा व कीर्तनकार भावरत्न गुरुदास ह.भ.प. समाधान शर्मा महाराज यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ह.भ.प.समाधान शर्मा यांनी आई विषयी बोलत असताना म्हटले की या जगात आई शिवाय दुसरे कोणीही मोठे नाही.आपल्या आई वडिलांची सेवा करा. आणि पुढे बोलतअसताना म्हणाले की,देवाला माझा म्हणा आपल्याला सर्व काही मिळेल.जसे की जनाबाईने पांडुरंगाला माझा पांडुरंग म्हटले तसं आपण ही देवाला माझा म्हणायची सवय लावा. आपणाला ही सर्व काही भेटेल परंतु आपण माझा म्हणत नाही आमचा म्हणतो म्हणून आपण देवाच्या जवळ नाहीत. आई वडिलांची सेवा करून आई वडिलांना आनंदी ठेवा.या कार्यक्रमाला भाजपचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा (काकाजी),अजित पवार राष्ट्रवादी गटाचे नेते रमेशराव आडसकर,मा. जि.प.सदस्य विक्रम मुंडे, भाजपाचे नेते रमाकांत मुंडे,धैर्यशील देशमुख विडेकर,माधवराव मोराळे,अंकुशराव इंगळे,जी.बी.गदळे सर, डॉ.वसुदेव नेहरकर,मुरली ढाकणे,भगवान केदार, सरपंच आनिताताई दहिफळकर,उपसरपंच येडू नाना ठोंबरे,माजी सरपंच बालासाहेब मोराळे,गाताडे मारुती, पी.डी.मुरकुटे,शरद इंगळे, शिवाजी पाटील,अमर भैय्या पाटील,महादेव सूर्यवंशी,चंद्रभानपाळवदे, संतोष भैय्या शर्मा,अंकुश कलाने तसेच गावातील व पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक युवक कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन राहुल भैय्या गदळे, डॉ.शशिकांतदहिफळकर, डॉ.शालिनीताई कराड (गदळे),प्राचार्या जयश्री ताई गदळे मॅडम,अभियंता शरद बप्पा गदळे,जयदत्त दहिफळकर यांनीपरिश्रम घेऊन हा कार्यक्रमयशस्वी केला.या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्वांचे राहुल भैय्या गदळे यांनी आभार मानले.




# करमाळा पोलिसांची चमकदार कामगिरी

## चोरट्याकडून ५० हजारांची मोटारसायकल जप्त

दैनिक वादळ वार्ता

**करमाळा | प्रतिनिधी**

करमाळा पोलिसांनी चोरीस गेलेल्या ५० हजार रूपये किंमतीच्या मोटारसायकलचा छडा लावून चोरट्याला अटक केली. ओंकार संजय जाधव यांच्या मालकीची काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस (एमएच ४२ ए.यू. ४३८९) मोटारसायकल ९ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री चोरीस गेल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.



करमाळा पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने पोलीस निरीक्षक रणजीत माने यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या साहाय्याने आरोपी नामदेव बबन चुनाडे (वय ५२, रा. अनिल नगर, पंढरपूर) यास पंढरपूर येथे पकडले. संबंधित आरोपीने चोरीची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. या कारवाईत पोहेकॉ. अजित उबाळे, मनिष पवार, वैभव ठेंगल, रविराज गटकुळ, अर्जुन गोसावी, येवले, हनुमंत भराटे, अमोल रंदिल, गणेश खोटे, सायबर शाखेचे व्यंकटेश मोरे तसेच पोहेकॉ. भाउराव शेळके यांनी महत्वाची भूमिका बजावली.

या शौर्यपूर्ण कामगिरीसाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस आणि पोलीस निरीक्षक रणजीत माने यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. पुढील तपास पोहेकॉ. भाउराव शेळके करीत आहेत.

## चांदसैली घाटातील पीडितांना मोठा दिलासा!

# राज्य शासन सर्वतोपरी मदतीसाठी पाठीशी ठामपणे उभे आहे–पालकमंत्री कोकाटेंची ग्वाही

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील चांदसैली घाटात छोटा हत्ती गाडी घसरून पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातामुळे जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. या दुर्दैवी घटनेत काही निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या वेदनादायी घटनेनंतर राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डव्होकेट माणिकराव कोकाटे यांनी दिनांक २० ऑक्टोंबर २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात धाव घेऊन जखमींची विचारपूस करत तातडीच्या मदतीची ग्वाही दिली.



पालकमंत्री डव्होकेट कोकाटे यांनी सकाळी नंदुरबार जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल असलेल्या प्रत्येक जखमी नागरिकाची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची बारकाईने माहिती घेतली. त्यांनी रुग्णालयातील डॉक्टर व अधिकाऱ्यांशी संवाद साधत अपघातग्रस्तांना आवश्यक औषधे, रक्तपुरवठा आणि आरोग्य सुविधांसह सर्वोत्तम व तातडीचे उपचार त्वरित उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

या वेळी पालकमंत्री डव्होकेट कोकाटे यांनी मृत झालेल्या भाविकाप्रती तीव्र संवेदना व्यक्त केल्या. ते म्हणाले, ही दुर्घटना अत्यंत वेदनादायी आहे. मात्र, जखमींना सर्वोत्तम उपचार आणि त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक मदत मिळावी यासाठी राज्य शासन व प्रशासन सातत्याने संपर्कात आणि कार्यरत आहे. या कठीण प्रसंगात राज्य शासन अपघातग्रस्त कुटुंबियांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील.

या भेटीदरम्यान आमदार राजेश पाडवी, आमदार आमशा पाडवी यांच्यासह सामान्य रुग्णालयातील अधिकारी, आरोग्यकर्मी आणि रूग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

अपघाताची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, पोलीस, व आरोग्य विभागाने तत्परतेने बचावकार्य सुरू केले. जखमींना सुरक्षितरित्या रुग्णालयात हलवून वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनाकडून अपघातग्रस्त कुटुंबांना सर्वतोपरी मदत पुरवण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत.

## दिवाळीपूर्वी तळोदा पोलिसांचे 'सतर्कता कवच'

# बंद घरांमध्ये होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी नागरिक–पोलिसांनी समन्वय साधावा!.

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

दिवाळी सणाच्या काळात बंद घरे फोडून चोऱ्या होण्याच्या वाढत्या संभावनेमुळे तळोदा पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहून सुरक्षितता बाळगण्याचे आणि पोलिसांशी समन्वय साधण्याचे आवाहन केले आहे. नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, अप्पर पोलीस अधीक्षक आशिष कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकुवा सुभाष भोये यांच्या मार्गदर्शनाखाली व यांच्या सूचनेनुसार तळोदा पोलीस निरीक्षक राजू लोखंडे यांनी विशेष सूचना जारी करत, मौल्यवान वस्तू घरात ठेवून बाहेरगावी जाणे टाळण्याचे निर्देश दिले आहेत.

मागील अनेक वर्षांचा अनुभव पाहता, दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये नागरिक घराला कुलूप लावून बाहेरगावी जातात, आणि याच संधीचा फायदा घेत चोरटे घरफोडी करतात. अशावेळी, शेजाऱ्यांनाही संबंधित कुटुंब बाहेर गेल्याची माहिती नसल्यामुळे चोरीची घटना उघडकीस येण्यास विलंब होतो, जो चोरट्यांच्या पथ्यावर पडतो. त्यामुळे नागरिकांनी सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

पोलीस निरीक्षक राजू लोखंडे यांनी नागरिक हितासोबतच पोलिसांना तपासात मदत व्हावी, यासाठी खालील महत्त्वाचे आवाहन केले आहे:ज्यामध्ये घरातील सोन्या–चांदीचे दागिने आणि रोकड घरात ठेवू नका. शक्य असल्यास त्या सोबत घेऊन जा किंवा सुरक्षित बँकेच्या लॉकरमध्ये ठेवा. यामुळे चोरी झाल्यास मोठा आर्थिक फटका बसणार नाही. बाहेरगावी जाण्यापूर्वी याबाबत विश्वासू शेजाऱ्यांना माहिती द्या. यामुळे आपल्या गैरहजेरीत संशयास्पद हालचाल दिसल्यास ते तातडीने पोलिसांना कळवू शकतील आणि चोरी त्वरित रोखता येईल. आपण बाहेरगावी जात असाल तर तळोदा पोलिसांनाही याबाबत कळवावे. ही माहिती मिळाल्यास पोलीस आपल्या परिसरामध्ये विशेष गस्त वाढवतील ज्यामुळे चोरीचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी होईल. पोलीस निरीक्षक राजू लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली तळोदा पोलीस स्टेशनने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उपाययोजना तीव्र केल्या आहेत. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी लवकरच प्रसिद्धी पत्रक जारी केले जाईल. तसेच, दिवाळीच्या सुट्टीमध्ये शहरात, वसाहतींमध्ये आणि गावाबाहेरील परिसरात रात्रीची गस्त अधिक प्रभावी करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.या उपायांमुळे नागरिक आणि पोलीस यांच्यात समन्वय साधला जाऊन, दिवाळीच्या काळात होणाऱ्या चोऱ्यांच्या घटनांवर नियंत्रण मिळवता येईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि डॉ.जयश्री थोरात यांच्याकडून पूरग्रस्तांना जीवनावश्यक मदत

दैनिक वादळ वार्ता

**पाथर्डी | प्रतिनिधी**

माजी महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात आणि डॉ. जयश्री थोरात यांच्या वतीने पाथर्डी तालुक्यातील तिसगाव, करंजी, कोरडगाव आणि परिसरातील पूरग्रस्त नागरिकांना जीवनावश्यक वस्तू, किराणा किट्स आणि ब्लँकेट्सचे वाटप करण्यात आले. पाथर्डी तालुका काँग्रेसच्या वतीने झालेल्या या दौऱ्यात अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. या वेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष नासिर शहानवाज शेख म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात साहेब यांनी काही दिवसांपूर्वी पाथर्डी तालुक्यातील विविध पूरग्रस्त भागांची पाहणी करून नागरिकांना मानसिक आधार दिला. त्यांच्या सूचनेनुसार पूरग्रस्तांसाठी थोरात साहेब व डॉ. जयश्री थोरात यांनी मदत पाठविली आहे.

ते पुढे म्हणाले की, राज्य सरकारने पूरग्रस्तांना तातडीने मदत द्यावी आणि पाथर्डी तालुक्यातील मोठ्या प्रमाणातील नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांना विशेष पॅकेज जाहीर करावे. परंतु सध्या दिली जाणारी मदत तुटपुंजी असून शासन पंचनामे आणि अहवालांच्या नावाखाली वेळकाढूपणा करत असल्याचे त्यांनी सांगितले. थोरात साहेबांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष लवकरच राज्यस्तरावर तीव्र आंदोलन छेडून शेतकरी आणि पूरग्रस्तांना योग्य ती मदत मिळवून देईल, असा निर्धारही या वेळी व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष नासिर शहा नवाज शेख, अनुसूचित जाती विभागाचे तालुकाध्यक्ष गणेश दिनकर, शहराध्यक्ष रवींद्र पालवे, सेवादल तालुकाध्यक्ष किशोर डांगे, युवक काँग्रेस शहराध्यक्ष जुनेद पठाण, करंजी गण मंडळ अध्यक्ष संपतराव, अल्पसंख्यांक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष असलम सय्यद, एनटी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष भाऊसाहेब गोसावी, सरपंच रफिकभाई शेख, सरपंच इलियास शेख, सामाजिक कार्यकर्ते इरफान बागवान, समीर बागवान, दत्ताभाऊ केदार, फत्तुभाई शेख, सत्तारभाई शेख आणि इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. पूरग्रस्तांकडून या मदतीबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले असून त्यांनी थोरात दांपत्यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.



# वर्षावास काळात बुद्ध आणि त्यांचा धम्मग्रंथाचे वाचन अंतर्मनातून करून तसे आचरण करणे गरजेचे-पूज्य भिक्खू धम्मशील थेरो

## नागसेन बुद्ध विहार येथे वर्षावास धम्म ग्रंथ वाचन समापन कार्यक्रम उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

२५०० वर्षापूर्वी तथागतांनी श्रावस्ती, राजगृह, वैशाली, नालंदा अशा विविध ठिकाणी आपल्या देशनेतून मानव कल्याणाकरिता प्रज्ञा,शील,अष्टांगिक मार्ग व मैत्री, करुणा, दान पारमिता बद्दल बहुमोल उपदेश केला. तीच परंपरा भिक्खू संघाने पुढे चालू ठेवून वर्षावासातील ३ महिने तथागतांचा उपदेश परिसरातील उपासक,उपासिकांना विहारात राहून समजावून सांगत असत. अभ्यासाअंती खूप मेहनत घेऊन डॉ. बाबासाहेबांनी तथागतांचा बहुमोल उपदेश बुद्ध आणि त्याचा धम्मग्रंथ या ग्रंथाद्वारे सर्वसामान्यांना समजावा म्हणून लिखित स्वरूपात जो की त्यांचा शेवटचा लिहिलेला ग्रंथ आहे. वर्षावासातील या ग्रंथाचे वाचन हे केवळ वाचन न करता ते वाचन अंतर्मनातून करून तसे आचरण करणे कसे मानव कल्याणाचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे धम्मग्रंथ वाचन समापन प्रसंगी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या मधुर वाणीतून उपस्थित उपासक उपासिका यांना बालक बालिकानां धम्मदेशने द्वारे सांगितले. सर्वप्रथम भिकखू धम्मशील थेरो भिकखु धम्मबोधी शिवनी यांची कृषी कॉलनी ते नागसेन बुद्ध विहार सवाद्य रॅली काढण्यात आली. विहारात आगमन झाल्यानंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण पूज्य भन्ते धम्मशील थेरो यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम आदर्शाची पूजन भन्तेच्या हस्ते करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विहार कमिटीतर्फे महिला उपोसकांनी पूज्य भंतेचे पुष्पगुच्छ देऊन त्रिवार वंदन करून स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक बौद्धाचार्य ज्ञानोबा पोटभरे यांनी केले तर सूत्रसंचालन से. नी वरिष्ठ शाखा प्रबंधक एल.आय. सी बीड आयु. यु एस वाघमारे यांनी केले. याप्रसंगी श्री परमेश्वर बनकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचाराने चालण्याचे महत्त्व विशद केले. आपल्या देशनेत पूज्ज भन्ते म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुमोल उपदेशांचा सखोल विचार करून विचारपूर्वक प्रत्येक रविवारी बौध्दानी सहकुटुंब विहारात यावे आणि मनाला सुख ,शांती , समाधान देणाऱ्या धम्माचे तत्व आगींकारुण आपले जीवन समृद्ध करावे आणि बुध्द धम्माचा प्रचार व प्रसार करणारी चळवळ आधिक गतीमान करण्यासाठी आपले योगदान द्यावे. केशरताई त्रिंबकराव कांबळे यानी उपस्थिता प्रती आभार व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील व शहरातील बहुसंख्य उपासक,उपासिका बालक-बालिकांची उपस्थिती होती शेवटी सरणत्तयने व भोजन दानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# सारथी एज्युकेशन संस्थेकडून गरजू कुटुंबांना दिवाळी निमित्त किराणा साहित्य भेट

## सारथी एज्युकेशनचा संस्थेचा गरजूंना आधार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथील बँकिंग क्षेत्रात अधिकारी घडवणारी सारथी एज्युकेशन संस्था यांच्याकडून केज तालुक्यातील कुंबेफळ, सारणी, आनंदगाव, पिसेगाव, चंदनसावरगाव, कळमअंबा आदी गावातील शेतकरी,कामगार,मजूर,अनाथ अशा कुटुंबांना दिवाळी भेट म्हणून किराणा साहित्य वाटप केले. सारथी एज्युकेशन संस्थेचे संचालक राहुल मिसाळ ज्ञानदेव व्हराडे,सहशिक्षक अक्षय चोळके , प्रदीप व्हराडे , किरण औताडे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा अधिकारी बीड आनंद कदम सीबीओ कळंब, डॉ. हनुमंत सौदागर, सरपंच अविनाश पांचाळ, सुरेश थोरात, प्रकाश थोरात, रतन थोरात, सुनिल थोरात, धनराज थोरात, मोतीराम थोरात,



कुंबेफळ येथील भूमिपुत्र एसबीआय बँकेत सीबीवो पदावर कार्यरत असलेले धनराज थोरात यांच्या समन्वयातून एक हजार गरजू कुटुंबांची दिवाळी गोड झाली यामुळे लाभार्थी कुटुंबांनी कृतज्ञता व्यक्त केली.

किशोर थोरात, विष्णु थोरात, संदिप थोरात, नरसिंग थोरात, आकाश थोरात, अमोल थोरात, ऋषिकेश थोरात, बाळासाहेब इंगळे आदींच्या हस्ते किराणा किट भेट देण्यात आल्यायावेळी बोलताना राहुल मिसाळ म्हणाले सामाजिक बांधिलकी म्हणून आमच्याकडून ही छोटीशी भेट देत आहोत ते आमचे कर्तव्य आहे असे मत व्यक्त केले. सर्दी एज्युकेशन संस्थेतून शिक्षण घेऊन अधिकारी बंधू-भगिनींनी निधी संकलन करून यामधून हे सेवा कार्य आम्ही चालवत आहोत. तरुणांना शिक्षणासाठी आम्ही काय मदत करतो असे मत व्यक्त केले.

# रंजेगाव येथील दोनशे शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन तर्फे मोफत बियाण्यांचे वाटप

## ॲड.अजित देशमुख यांच्या हस्ते वाटप



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील रंजेगाव येथील पूरग्रस्त आणि अतिवृष्टी बाधित दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात आले. नाम फाउंडेशन तर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात येत आहे. रंजेगाव येथील या शेतकऱ्यांना स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड.अजित एम. देशमुख यांच्या हस्ते बियाणांचे वाटप करण्यात आले. बीड जिल्ह्यातील कुर्ला या गावात वाटप करण्यात आल्यानंतर माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथे देखील नाम तर्फे बियाण्याचे वाटप करण्यात आले. रंजेगाव येथील दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करताना गावातील रहिवाशी सामाजिक कार्यकर्ते आसाराम आबूज यांनी विशेष मेहनत घेतली. आसाराम आबूज यांना या कामात एकनाथ आबूज रामनाथ आबूज यांनी मदत केली. शेतकऱ्यांना आबुज सर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी प्रत्येक शेतकऱ्यांना ३० किलो हरभऱ्याच्या बिया सह ज्वारीचे बी देखील देण्यात आले. बियाण्यांची पेरणी करून शेतकऱ्याने चांगले उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करावा. तसेच गावात पाणीसाठा वाढावा यासाठी नदी खोलीकरण अथवा गाळ काढण्याचे काम करावे त्यासाठी पोकलेन मशीन मोफत देण्यात येतील, असे आवाहन ड. अजित देशमुख यांनी यावेळी केले.

# एसबीआय बँकअधिकारी संघटनेचे महाराष्ट्र राज्य महा सचिव डॉ.सतीश टाके यांची केज येथील स्वामी समर्थ मठात सदिच्छा भेट

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या एसबीआय बँकेच्या अधिकारी संघटनेच्या निवडणुकीत महासचिव म्हणून निवडून आलेल्या डॉ.सतीश टाके यांनी केज येथील श्री स्वामी समर्थ मठात भेट दिली.यावेळी त्यांनी श्री.स्वामी समर्थां च्या बाल रूपातील अजानबाहु मुर्तीचे व पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.यावेळी श्री स्वामी समर्थ मठाचे विश्वस्त मंदार देशपांडे यांनी त्यांचे स्वागत केले व श्री स्वामी समर्थांची मूर्ती भेट देवून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी गणेश देशपांडे,दिनेश देशपांडे, राजेश देशपांडे,विनायक ठोंबरे,रोहन वेदपाठक, संतोष रिनवा यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की,केज येथील स्वामी समर्थ



मठात येऊन दर्शन घेण्याची खुप इच्छा होती ती आज पुर्ण झाली. स्वामी समर्थ मठात होत असलेल्या विविध कार्यक्रमा विषयी मंदार देशपांडे यांनी माहिती दिली.

# विभागीय हॉलीबॉल स्पर्धेत सोमनाथ बोरगाव माध्यमिक विद्यालयाचा संघ अजिंक्य

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

१४ वर्षे वयोगटाच्या मुलींच्या हॉलीबॉल स्पर्धेत श्रीदत्त माध्यमिक विद्यालय सोमनाथ बोरगाव या संघाची प्रथम आल्याने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.बीड येथील छत्रपती संभाजी राजे क्रीडा संकुल येथे विभागीय हॉलीबॉल स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत श्रीदत्त माध्यमिक विद्यालय सोमनाथ बोरगाव या विद्यालयाचा १४ वर्ष वयोगटातील मुलींचा संघ अजिंक्य राहिला असून त्यांची निवड राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी झाली आहे. या स्पर्धेसाठी विभागातून सात संघ उपस्थित होते. अंतिम सामना छत्रपती संभाजी नगर ग्रामीण



यांच्याबरोबर ही अटीतटीची लढत झाली. हा सामना दोन शून्याने विद्यार्थ्यांनी जिंकला.यशस्वी संघाचे अभिनंदन वेणुताई चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव राजपाल लोमटे उपाध्यक्ष सतीश नाना लोमटे मुख्याध्यापक भागवत हावळे सोमनाथ बोरगाव येथील उद्धव तात्या सोमवंशी यांनी केले आहे.या संघाला शाळेतील क्रीडा शिक्षक टी एन काळे काकडे सर चोपडे सर शिरसाट सर राठोड सर बोबडे सर श्रीमती मोरे मॅडम तसेच शिक्षकेतर कर्मचारी जाधव साखरे शिंदे राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

## जयहिंद गोरक्षण गोशाळा कानडी माळी व सह्याद्री प्रतिष्ठान बीडच्या वतीने

# संकटात कर्तव्यपूर्ती, पूरग्रस्त शेतकऱ्यां साठी दिवाळीफराळ,किराणा किट वाटप

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

मराठवाड्यातीलधाराशिव जिल्ह्यातील भुम,परांडा तालुक्यातील लाखी, ईडा,आंतरगाव या गावात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर,त्यांची आगामी दिवाळी गोड व्हावी यासाठी हा मदती चा नाही,तर कर्तव्य पार पाडले सह्याद्री प्रतिष्ठाण बीड आणि जय हिंद गोरक्षण गोशाळा कानडी माळी यांच्या संयुक्त विद्यमाने पूरग्रस्त शेतकरी बांधवांसाठी दिवाळीसाठी १२१ किराणा किट वाटप करण्यात आलेल्या कठीण काळात,आपल्या बांधवांना आधार



देणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे.या उद्देशाने शेतकरी बांधवांना आर्थिकसंकटात गोर गरीब शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्या साठी जय हिंद गोरक्षण गोशाळा कानडी माळी व सह्याद्री प्रतिष्ठान बीडच्या वतीने दिवाळी फराळ व किराणा किटचे अतिवृष्टी पुरग्रस्त शेतकऱ्यांनावाटप करण्यात आले.आर्थिक मदत करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार आपल्या मदतीमुळे,अनेक कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचे हास्य फुलवू शकले.सहभागी ऋषिकेश जाधव,सिध्दार्थ (सोनू) राऊत,अशोक खेत्रे,भारत राऊत,पुष्पक गिरमे या नंतर ही मदतकार्य सुरूच राहणार आहे जेव्हा मदतीची गरज पडल्यास असे अशोक खेत्रे व सहकार्यानी म्हटले आहे. मदत करणाऱ्यांचे मना पासून आभार मानले आहेत.

# केज शहरात प्रथमच माफक दरात 'आयुर्वेदिक कांस्यथाळी फूट मसाज थेरपी' व मसाज चेअर सुविधा

## वरुण शिंदे पाटील यांचा अभिनव आरोग्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील नागरिकांसाठी आरोग्य संवर्धनाचा एक नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आरोग्य जपण्यासाठी व नैसर्गिक उपचारपद्धतीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने प्रथमच 'आयुर्वेदिक कांस्यथाळी फूट मसाज थेरपी' आणि मसाज चेअर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा अभिनव उपक्रम केज तालुक्यातील तरुण उद्योजक वरुण शिंदे पाटील यांनी हाती घेतला असून, ही सेवा बीड-अंबाजोगाई रोडवरील सरकारी दवाखान्याजवळ सुरू करण्यात आली आहे.या थेरपीद्वारे शरीरातील ताण, थकवा, वेदना कमी करून रक्ताभिसरण सुधारते, शरीरातील उष्णता संतुलित राहते तसेच मानसिक शांतता मिळते, असा तज्ज्ञांचा दावा आहे. विशेष म्हणजे, ही सेवा सर्वसामान्यांना परवडेल अशा माफक दरात उपलब्ध करून देण्यात आली आहे.या उपक्रमाबाबत बोलताना वरुण शिंदे पाटील म्हणाले, आजच्या ताणतणावाच्या जीवनात नैसर्गिक उपचारपद्धतीकडे लोकांचा ओढा वाढत आहे. त्यामुळे लोकांना परवडेल अशा दरात दर्जेदार आयुर्वेदिक थेरपी देऊन त्यांचे आरोग्य सुदृढ ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे.या नव्या उपक्रमाला आरोग्यप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, केज तालुक्यातील आरोग्य क्षेत्रात हा एक नवा आणि प्रेरणादायी प्रयोग ठरत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077